
# चिखली तालुका -इतिहास व भूगोल

## तालुका उपमुद्दे-स्थान,विस्तार,सीमा, रचना,क्षेत्रफळ,लोकसंख्या

**स्थान:-** भारतातील महाराष्ट्र राज्याच्या अमरावती विभागात बुलढाणा जिल्ह्याच्या दक्षिण दिशेला चिखली तालुका आहे. चिखली हे गाव जालना खामगाव मार्गावर आहे. **बुलडाणा मुख्यालयापासून २५ किमी. अंतरावर . असणारे तालुक्याचे ठिकाण** चिखली हे मलकापूर ते पुणे व नागपूर ते पुणे राज्य महामार्गावर मध्यवर्ती ठिकाणी आहे
**विस्तार.:- १९३० मध्ये चिखलीला तहसिल कार्यालयाची स्थापना** १११३.00 **चौ कीमी क्षेत्रफळात चिखली तालुका विखुरला आहे . २००१ मध्ये** देऊळगाव राजा तालुक्यातील **३६ गावाचा समावेश चिखली तालुक्यात करण्यात आला**
**सीमा:-**चिखलीच्या उत्तरेस बुलढाणा व खामगाव तालुका असून दक्षिणेस देऊळगाव राजा तालुका आहे. पश्चिमेस जाफ्राबाद तालुक्याची सीमा पूर्वेस मेहकर तालुका आहे
**रचना:-**चिखली तालुक्यात एकूण १शहर व १४५ गावे आहेत.
**क्षेत्रफळ :-**चिखली तालुक्याचे क्षेत्रफळ १११३.00 चौरस किलोमीटर आहे.
**लोकसंख्या :-**२०११ च्या जनगणनेनुसार चिखली तालुक्याची लोकसंख्या २८५३२१ असून त्यापैकी शहरी लोकसंख्या५७८८९ तर ग्रामीण लोकसंख्या २२७४३२ आहे. 2011 च्या जनगणनेनुसार, चिखली येथील एकूण कुटुंबे ११८६४ होती. एकूण साक्षरता ८९.२८ टक्के आहे पुरुष स्त्री गुणोत्तर ९३१ आहे

### चिखली तालुका नकाशा



## 2.इतिहास.ऐतिहासिक राजवटीचा इतिहास,राजकीय स्थित्यंतर,राज्यकर्ते,प्राचीन गावे

**चिखली शहराचा इतिहास**

चिखली हे शहर जांबुवंती नदीच्या काठावर बसलेले शहर आहे.  बुलढाणा जिल्यातील चिखली शहर हे इंग्रजांचे गढ समजल्या जायचे येथे इंग्रजांनी मोठं मोठ्या तेल फेक्टरी, कापूस जिनिग वस्त्रोउद्योग निर्मिती सरकारी कामकाज व्यवस्थापन स्थापन करून ठेवलेल्या होत्या..
चिखली तालुका शैक्षणिक दृष्ट्या आघाडीवर असलेले शहर आहे. पंढरीनाथ पाटील यांनी पंजाबराव देशमुख यांच्या सहकार्याने शैक्षणिक जाळं विणलं आहे. चिखली येथे श्री शिवाजी शिक्षण संस्था स्थापन केलेली असून या शाळेमध्ये ग्रामीण भागातून विद्यार्थी शिकण्यासाठी येतात तसेच चिखलीमध्ये सद्यस्थितीत अनुराधा इंजिनिअरिंग कॉलेज , सुनिल रामसिंह चुनावाले आयुर्वेदिक महाविद्यालय (मेडिकल कॉलेज) शासकीय तंत्रनिकेतन तसेच अनेक शैक्षणिक संस्था असून त्यामध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेतात. इतर तालुक्याच्या मानाने चिखली तालुका शैक्षणिक क्षेत्रात आघाडीवर आहे.
चिखली येथे रेणुका देवीचे मंदिर शहराच्या मध्यभागी आहे चैत्र पोर्णिमा एक शुभ  .मंदिर एक आश्चर्यकारक स्मारक आहे .  दिन आहे जेव्हा रेणुका देवी"यात्रा" आयोजित केली जातेचिखली मध्ये ., जुन्या शहरातील भगवान शिव मंदिर पाहण्याची आणखी एक जागा आहेया ठिकाणाचा सर्वात उल्लेखनीय वैशि .ष्ट्य म्हणजे महाजनचे जुने लाकूड आणि खडकांमध्ये तयार केलेल्या 100 पेक्षा जास्त खोल्या असलेले एक मोठे घर आहे . चिखली येथे शहामदन शहावली कबर असून दर्गाआहे थे उरूस भरतो



## 3.ऐतिहासिक स्थापत्य किल्ले, वाडे राजवाडे,मंदिरे,प्राचीन मूर्ती स्थापत्य, पाय विहीर, नाणी,उत्खनन स्थळे,भांडी,ब्रिटिश कालीन वास्तू,गढी,

**करवंड:-** छत्रपती शिवाजी महाराजांच्या आठव्या पत्नी गुणवंताबाई याच गावातील इंगळे कुटुंबातील. इंगळे देशमुख या गावाचे वतनदार त्यांना या परिसरातील ५२ गावाची वतनदारी मिळालेली होती. वतनाला संभाळण्याकरीता इंगळे देशमुखांनी ५२ बुरुजांची गढी बांधली. म्हणून या गावाला ‘बावन्नबुरुजी’ असेही म्हणत. करवंड गावात ५२ बुरुज होते . त्यामुळे गावाला **'बावन्न बुरुजी'** असेही म्हणत .सध्या या बुरुजांचे अवशेष तेवढे दिसतात .५२ **बुरुजापैकी आजही ८ बुरुज कायम** आहेत . गढीच्या मध्यभागी एक विहीर आहे गढीच्या पूर्वेला इंगळे देशमुखांच्या वाडयाचे अवशेष आहेत इंगळे . देशमुखांचे वारस आज तंजावरला राहतात त्यांची जमीन करवंडला आहे. गढीवर एक मुस्लिमांची दर्गा सुद्धा आहे .



**चिखली मौनी बाबा आणि उदासीन बाबांचे मठ या गावाचे वैशिष्ट्य राहिले आहे इंग्रज कालीन नाझरीन चर्च रेणुकादेवी आणि गणपतीचे मंदिर प्रसिद्ध आहेत** . ग्रामदेवता रेणुका माता मंदिर गावाच्या मध्यभागी आहे . रेणुकामाता मंदिराच्या गाभाऱ्यात जाताच समोर शेंदूरचर्चित, उत्तराभिमुख असलेली, प्रसन्न वदना रेणुकामाता मन मोहून टाकते. देवीच्या गाभाऱ्यातील घुमटावर अनेक देवीदेवतांच्या मूर्ती चित्रित केल्या आहेत. मंदिराबाहेरच बच्चानंद महाराजांची समाधी आहे.

**अमडापूर** अमडापूर येथील वास्तू ह्या चिखली तालुक्यात सर्वात प्राचीन वास्तु व अवशेष अमडापूर येथे आहे. गावात वेळोवेळी झालेल्या उत्खणनात बऱ्याच पुरातन मुर्ती सापडल्या आहेत, ज्या नांवची पुरातन असण्याची व प्राचिन काळाची साक्ष देतात. गावात असलेले प्राचिन मंदीरे सुध्दा नांवचा पुरातनपणा सिद्ध करते




**प्राचीन अवशेष** **बल्लाळदेवी मंदिर**

अमडापूर मध्ये असलेले परिसराचे कुलदैवत असलेले बल्लाळ देवीचे प्राचिन मंदीर आहे बल्लाळ देवी चे मंदिरात टेकडी चढुन जाण्याकरीता पायथ्यापासून मंदीरापर्यंत चिरेबंधी पायऱ्या बांधलेल्या आहेत मंदीराचे बांधकाम विशिष्ट प्रकारच्या विटांनी बांधलेले आहे. ह्या विटा पाण्यावर तरंणतात हे त्याचे वैशिष्ठ आहे. मंदीरासमोर असलेल्या सभामंडपाला जयपुर स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना असलेले प्रवेशव्दार आहे. मंदीराच्या दर्शनी बाजुला भव्य, उंच व प्राचिन दिपमाळा आहे आत अष्टदशभुजा प्रसन्न पावन मुर्ती हि मुर्ती महिषासुर मर्दीनीची आहे .

मंदीराचे समोरच नजरेस पडतात ती आई जगदंबेची भव्य पाऊल शिल्पे ह्या पाऊलांची लांबी ६ फुट लांब व २॥ फुट रुंद व २ फुट उंच आहे. बाजुलाच एका हातात खड्ग व एका हातात लाडुचा प्रसाद असणारे दगडी शिल्प आहे. त्यानुसार देविची अतिप्राचीन व भव्य मुर्ती ५१ फुट उंचीचीमूर्ती होती काळाच्या ओघात ह्या मुर्तीची फुटतुट फोडतोड झालेली होती.




## जगदंबेची भव्य पाऊल

मंदिर परिसराच्या समोरील बाजूस उत्खननामध्ये सापडलेल्या अनेक मूर्ती ठेवलेल्या आहे त्यामध्ये . त्या मंदीरासमोर बटुवामन व बळी राज्याची मूर्ती दगडी शिळेवर कोरलेल्या चंद्र व सुर्याच्या प्रतिमा तसेच सप्तमातृका आहेत.

शिवपार्वती व विष्णुची मुर्ती आहे. त्यानंतर खंडेरायाचे मंदीर व बालाजीचे मंदीर आहे  महादेवाचे मंदिरासमोर  असलेला ऐटदार बसलेला नंदी  शिल्पकलेचा उत्कृष्ठ नमुना आहे.  जवळच पाच फणा असलेले नागराजाचे शिल्प आहे. काळभैरवाची मुर्ती आहे.  बजरंग बलीची दुर्मीळमूर्ती ,.
मंदिराचा पहिला जिर्णोध्दार हा संभाजी राजांचे कमाविसदार खंडो बल्लाळ हयांनी केला  म्हणून या देवीच्या मंदिराला "बल्लाळ देवी " म्हणतात असा उद्देश "व-हाडचा ईतिहास" या पुस्तकात आहे.

**प्राचीन महादेव मंदिर**

बल्लाळदेवी पुष्करणीजवळच व मंदीर परिसरात हेमाडपंथी महादेवाचे अतिप्राचीन मंदीर आहे. गाभाऱ्यात उत्कृष्ठ व दुर्मिळ महादेवाची पिंड आहे. मंदीराचे बांधकाम संपुर्ण दगडी असुन कोठेही चुना किंवा सिमेंटचा वापर केलेला नाही. हया मंदीरात यादवकालीन शिलालेख असुन मंदीराच्या प्राचिनतेची साक्ष देतो. मंदीराच्या समोरच एक सुंदर बांधकाम असलेली विहीर असुन त्यात उत्कृष्ठ बांधकाम असलेला भव्य दरवाजा आहे.  . 'मन नदी तिरावरच एक हेमाडपंथी महादेवाचे मंदिर आहे.



## यादवकालीन शिलालेख

पुष्करणी हे अमडापूर ते मेहकर रोडवर गावा पासून एक कि. मी. अंतरावर एक प्राचीन सरोवर आहे. ज्यांला बल्लाळ   देवी पुष्करणी असे म्हणतात. पूर्वी सरोवरात  कमळाची लाल च पांढ-या रंगाची फुले सरोवरात  आढळत असत .अमडापूर येथे प्राचीन पांढरी मातीचे ढीग असून ब्राह्मणवाडा, धुमा, मेडशिंगा ही उजाड गावे आहेत. या परिसरामध्ये असलेली पांढरी माती ही प्राचीन काळामध्ये कृत्रिम रीतीने बनवलेली आहे. मध्ययुगामध्ये अमरापूर मध्ये देशमुख यांची वतनदारी होती. तसेच ही मध्ययुगीन  काळातील व्यापार पेठ असून आजही तिथे सौदागर आडनावाची मध्ययुगातील व्यापाऱ्यांची वंशज राहतात. मन नदीच्या पात्रामध्ये मिळणारे मौल्यवान दगड हे मध्ययुगामध्ये सत्ताधाऱ्यांना आर्थिक दृष्ट्या प्रबळ केल्याचे दिसते. त्यामुळेच अकबराचा मुलगा यांनी खामगाव तालुक्यात शहापूर हे गाव स्थापन केले. व काही काळ तेथे मुघलांची राजधानी  होती...अमडापूर  मध्येमन नदीच्या काठावर एक पाय विहीर आहे ती यादवकाळातील आहे..अमडापूर मध्ये अनेक लोकांना प्राचीन,मध्ययुगातील नाणी सापडतात

**सातगाव :-** येथील मंदिर समूह पूर्वी बरीच मंदिरे होती असे महाराष्ट्राचे पूरातत्त्व . आज मात्र येथे तीन प्रमुख मंदिर दिसतात. त्यापैकी सर्वात प्रमुख आणि मोठे म्हणजे विष्णू मंदिर होय.




**विष्णू मंदिर-** विष्णू मंदिर हे ताराकृती गर्भगृहाचे असून त्याला प्रशस्त असा सभामंडप आहे. या सभामंडपाला तीन द्वार आणि त्यावर तीन मुखमंडप आहेत. सभामंडपाचे छत उतरत्या बांधणीची आहे द्वाराच्या बाजूस अर्धस्तंभ आहेत. सर्वात आतल्या बाजूस पुष्प हार नक्षी कोरलेली आहे. स्तंभाच्या बाजूस शाखा कोरलेली आहे.मंदिराच्या आत मध्यभागी शिवपिंडी आहे. एका बाजूस नागदेवता कोरलेली आहे

**साकेगाव** ;- साकेगाव येथे मध्ययुगातील बांधकाम शैलीचा उत्कृष्ट नमुना असलेले दगडाचे मंदिर आहे परिसरातील ग्रामस्थांचे दैवत असलेल्या या मंदिरावर चहुबाहुने उत्कृष्ट शिल्प व मूर्ती कोरलेल्या आहेत. आतमध्ये महादेवाची पिंड असून, मूर्तीच्या चहुबाजुने देवी, देवतांच्या मूर्ती आहेत या मंदिरालगत आणखी एक छोटे मंदिरही आहे इसवी सन 1259 ते 1274 या काळात मुख्य प्रधान राहिलेल्या त्या हेमात्री पंडित किंवा हेमाडपंथ यांनी या प्रकारच्या इमारत बांधणीचा महाराष्ट्र आणि दखखन पठारावर अनेक ठिकाणी उपयोग केला त्यामुळे या बांधणी पद्धतीला हेमाडपंथी असे नाव पडले

मंदिराच्या शिखरावर असलेल्या शिल्पपटात ब्रम्ह, सरस्वती, महादेव- पार्वती व विष्णु- लक्ष्मीच्या प्रतिमा आहेत. तसेच महिषासुरमर्दिनीच्या प्रतिमा आहेत





**डोंगरशेवली** -डोंगरशेवली येथे प्राचीन शिव मंदिर आहे त्याचा जिर्णोधार करण्यात आला आहे श्रावण महिन्यात यात्रा भरते .

**गोदरी** – गोदरी येथे प्राचीन रेणुका देवीचे मंदिर आहे प्राचीन मंदिराचे अवशेष असून मुख्य मंदिराचा नवीन सभामंडप बांधून जिर्णोधार करण्यात आला आहे . गावात गढी असून संपूर्ण गावात पांढरी मातीचे घरे होती जुन्या काळात गावात व्यापारी बाजारपेठ होती

**रोहडा -** रोहडा (तपोवन) येथेही रेणुका मातेचे प्राचीन मंदिर आहे येथे अश्विन आणि चैत्र महिन्यात यात्रा भरतात.प्राचिन मंदिराचा जिर्णोद्धार श्री.प्रेमराजजी भाला यांनी केलेला आहे.नवीन गर्भगृह काचेचे करण्यात आलेले आहे

**जांभोरा** – जांभोरा येथे येल्होजी महाराजांचे प्राचीन मंदिर निसर्गरम्य परिसरात आहे मंदिराचे बांधकाम हे मुघलकाळातील आहे येल्होजी महाराजांनी येथे समाधी घेतली आहे त्यांची काळया पाषाणातील मूर्ती मंदिर स्थळी आहे ते नाथ संप्रदायातील होते मुख्य मंदिराच्या बाजूला नवनाथ मंदिर , महालक्ष्मी मंदिर आहे , भुयार , आहे . येथील भांगोजी देशमुख यांचे कडे मुघलकाळात १० गावाची जहागिरी होती गावात त्यांची गढी आहे .

अमडापूर , डोंगरशेवली ,रोह्डा करवंड ,येथे जुने बारव आढळतात तर अमडापूर येथे पाय विहीर आहे

## 4.व्यक्तीविशेष=सरदार,सुभेदार,जहागीर दार,वतनदार,राजे,नवाब,समाज सुधारक,स्वातंत्र्य सैनिक,क्रांतिकारक...

**करवंड येथील इंगळे घराणे ..** करवंड येथील इंगळे सरदार हे मध्ययुगामध्ये महत्त्वाचे राजकीय घराणे होते. करवंड ता.चिखली ,जि.बुलढाणा हे इंगळे यांचे मुळ गाव आदीलशाहीमधे तसेच शहाजीराजे सोबत ह्या घराण्यातील मातब्बरांनी बऱ्याचदा तलवार गाजवली आहे... सरदार शिवाजीराव इंगळे,बहीरजी नाइक इंगळे, कान्होजी इंगळे हे स्वराज्यसेवेत शिवरायासोबत होते... अफजलखान भेटी दरम्यान यांनी पराक्रम गाजवला आहे..
**'गुणवंताबाई राणीसाहेब'** ह्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या आठव्या पत्नी होत. शिवाजी महाराज यांचा गुणवंताबाई यांच्या बरोबर **१५ एप्रिल १६५७** रोजी विवाह झाला.



**'गुणवंताबाई राणीसाहेब'**

जिजाऊ साहेबांबरोबर विदर्भातून जी घराणी आली होती, त्यामध्ये वऱ्हाडातील म्हणजे
आताच्या **'बुलडाणा'** जिल्ह्यातील **'चिखली'** तालुक्यातील **'करवंड'** येथील हे **इंगळे-देशमुख** घराणे होते. **हे घराणे मूळ तंजावरचे, परंतु त्यांचे वतन वऱ्हाडात होते.** इंगळे घराण्यातील एक शाखा राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समवेत महाराष्ट्रात आली होती. म्हणजे हे घराणे शहाजी राजांकडे राहात होते. दीपाबाईसाहेब ह्या व्यंकोजीराजेच्या पत्नी होत्या...
करवंड येथील इंगळे घराण्यातील काताजी इंगळे-देशमुख प्रतापगडावर युद्ध प्रसंगी शिवाजी महाराजांच्या दहा अंगरक्षकांपैकी एक होते. १६५९ मध्ये रायबागेच्या रणांगणावर रुस्तुम-ए-जमान आणि अफझलखानाचा मुलगा फाजल यांच्याशी झालेल्या युद्धात हिराजी इंगळे शिवरायांच्या घोडदळात होते.
किल्ले पन्हाळगडावर बाळाजी इंगळे (मुद्राधारी), त्र्यंबक इंगळे (किल्लेदार) आणि कान्होजी इंगळे यांनी इ.स. १६६२ ते १७०१ पर्यंत औरंगजेबास झुंजवत ठेऊन अखेर तह करण्यास भाग पाडले
सामाजिक न्याय देण्याच्या दृष्टिकोनातून शाहू महाराजांनी खामगाव येथे परिषद ठेवली होती त्या परिषदेचे कॉर्डिनेशन हे करवंड येथील इंगळे राजघराण्यातील राजे इंगळे यांनी स्वीकारले होते...
**शेळगाव आटोळ** येथील आटोळे हे ऐतिहासिक घराणे व त्यांच्यासोबत आणखी काही घराणी स्थायिक झालेली आहे. त्यांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील गुजुबाई असे आहे... त्यातील महत्त्वाचे पुरुष म्हणजे खंडोजी

आटोळे आहेत. खंडोजी आटोळे हे नागपूरच्या भोसले घराण्यातील महत्त्वाचे सरदार होते. तसेच काही काळ ते सरसेनापती सुद्धा होते..

**किन्होळा** येथील बाहेकर धोडप येथील कोल्हे हे मूळ पुणे जिल्ह्यातील असून यांचे सुद्धा आडनाव पवार आहे. यांचे राजकीय दृष्टिकोनातून मायग्रेशन झाल्याचे दिसते.....

**आनंद स्वामी** आनंद स्वामी नावाच्या सत्यशोधक समाजाच्या राष्ट्रीय कार्यकर्त्याचा चिखली तालुकाशी मोठा संपर्क होता... आनंद स्वामी हे मूळ मराठा समाजाचे असून ते अहमदनगर जिल्ह्याचे होते. त्यांच्यावर महात्मा फुले यांच्या विचाराचा प्रभाव होता... त्यांनी बुलढाणा जिल्ह्यामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना बोलावून सत्यशोधक समाजाची परिषद घेतली होतीइंग्रज काळामध्ये त्यांनी चिखली येथे शेतकऱ्यांची मोठे आंदोलन घडवून आणले होते..

बुलढाणा जिल्ह्यामध्ये जे शैक्षणिक वातावरण निर्माण झालेले आहे त्यामध्ये चिखली तालुक्याचा सिंहाचा वाटा आहे. आनंद स्वामी यांच्या माध्यमातून चिखली तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते तयार झाले. त्यांनी जातिभेद न मानता शैक्षणिक सुधारणा वर लक्ष दिले. त्यामुळे पंढरीनाथ पाटलाच्या रूपाने मोठे शैक्षणिक नेतृत्व चिखली तालुक्यामध्ये निर्माण झाले. त्यांनी चिखली येथील स्वतःच्या मालकीची खूप मोठी जमीन श्री शिवाजी शिक्षण संस्थेसाठी दान करून चिखली येथे खूप मोठी शैक्षणिक संस्था निर्माण केली त्यामुळे चिखली तालुक्यातीलच नव्हे तर बुलढाणा जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्याची व तळागाळातील मोल मजुरांची मुले शैक्षणिक रूपाने पुढे आली..

**क्रांतिकारक रामकृष्ण खत्री**

भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात लाखो क्रांतिकारकांच्या जीवन संविधा वाहिल्या गेल्या त्यापैकीच एक थोर क्रांतिकारक रामकृष्ण खत्री त्यांचा जन्म 3 मार्च 1902 रोजी चिखली येथे झाला होता. हिंदुस्तान रिपब्लिकन असोसिएशन या संस्थेचे सदस्य होते त्यांनी 'शहीदो की छाया मे' या पुस्तकाचे लेखन केलेले आहे इतिहासात प्रसिद्ध असलेल्या काकोरी कटात त्यांचा सहभाग होता. म्हणून त्यांना इंग्रजांनी दहा वर्षे कठोर कारावासाची शिक्षा दिलेली होती. 18 ऑक्टोबर 1996 रोजी वयाच्या 94 व्या वर्षी रामकृष्ण खत्री यांना लखनऊ येथे देवाज्ञा झाली




**संतोषराव पाटील उर्फ अप्पासाहेब –**

**चिखली तालुक्यातील सावरगाव डुकरे  पुरोगामी व्यक्तिमत्त्व , "दलित मित्र" आद्यग्रामसुधारक**

गांधीजींच्या प्रभावाखाली ते वाढले हो ते एक माहीना शौचलाय सफाई चे काम पूर्ण करून निर्विकार झालेल्या आप्पासाहेबांना ग्राम सुधारणा करून देशसेवा करावी हेच आपलं स्वातंत्र्य लढाईतील काम असल्याचे म. गांधीजींनी सांगितले.  **१९३६ ला** सावर्जनिक वाचनालय सुरु केले  सार्वजनिक पाणवठे खुले करण्यात आले .गाम सुधार केंद्र स्थापन केली आप्पासाहेब यांनी गावातील लोकांना लोकांचे पालकत्व स्वीकारले होते भोगावती या गावाला सावरगावचे लोक राहायला गेलेले या गावात सूतकताई केली जायची  1942 रोजी चिखली येथे खरेदी विक्री संघ स्थापन करण्यात आला होता  आप्पासाहेब पाटील यांनी त्याला उर्जित अवस्था आणली शेतकऱ्यासाठी त्यांनी काम केले स्वातंत्र्य चळवळ सत्यशोधक चळवळीमध्ये संतोषराव पाटील यांचे फार मोठे योगदान होते  देशाला स्वातंत्र्य मिळण्याच्या काळात आप्पासाहेबांना चिखली जनपद सभेचे सभापती होते अस्पृश्यता निर्मूलन झाले, सामूहिक विवाहाचा पहिला प्रयोग यशस्वी झाला. आप्पासाहेबांच्या कार्याची दखल मध्य प्रांत व बेरार सरकारने राष्ट्रीय स्तरावर घेतली  स्वातंत्र्य चळवळीतील पंढरीनाथ पाटील,  आप्पासाहेब पाटील  सखाराम अर्जुन पाटील ,त्र्यंबकराव  पाटील हे या गावातील महत्त्वाचे सैनिक होते

क्रांतीसिंह नाना पाटील हे सावरगावला  आठ दिवस राहिले येथे त्यांनी आपल्या सोबत  दोन सहकारी घेतले त्यांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम मध्ये सहभाग घेतला

१९६२  ला संतोषराव  पाटील आमदार झाले पंढरीनाथ पाटील यांच्या लोकनाट्य चळवळ त्यांनी सुरू केली



**मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर याच चिखली तालुक्यातील आहेत** पुरुषोत्तम खेडेकर हे मराठा सेवा संघ या संघटनेचे संस्थापक आहेत. शिवधर्म हा जगातील सतरावा धर्म आहे. अभ्यास व संशोधन करून त्यांनी शिवधर्म स्थापन केला. पुरुषोत्तम खेडेकर यांनी १ सप्टेबंर १९९० रोजी जिल्हा अकोला येथे मराठा सेवा संघाची स्थापना केली.

बुलढाणा जिल्हयातील चिखली तालुक्यात अंत्री खेडकर हे त्यांचे मूळगाव आहे. सुरुवातीला मुठभर लोकांना घेवुन दलित बहुजन समाजाच्या प्रश्नासाठी आवाज उठविला.[२] याच मराठा सेवा संघाला माननारा मोठा वर्ग तयार झाला पेशाने अभियंता असलेल्या खेडेकर साहेबांनी २१ व्या शतकात विज्ञानावर आधारित समाजबांधणी करून मानवाता वादी मुल्यांची जपणूक करीत बहुजन समाजची नाळ पुन्हा बळीराजा, गौतमबुद्धापर्यंत जोडण्याचे ऐतिहासिक काम केले आहे. बहुजन समाजाला वाचनाची त्यांनी गोडी निर्माण केली

## 5.सामाजिक स्थित्यंतरे.परिषद,मानव मुक्ती लढे,राजकीय शैक्षणिक संस्था परिवर्तने.

**सावरगाव डुकरे चिखली तालुक्यातील आधुनिक चळवळीत सहभाग घेणारे आदर्श ग्राम**

1936 मध्ये सावर्जनिक वाचनालय ग्रंथालय सुरू करण्यात आली सत्यशोधक चळवळीमध्ये सुद्धा या गावाचा सहभाग होता 1935 मध्ये सार्वजनिक पाणवठे खुले करण्यात आले बाळासाहेब भारदे यांच्या संपर्कात सावरगाव डुकरे येथील लोक होते गावचे पोलीस पाटील पदी अश्रुजी पाटील यांच्याकडे होते ते दूरदृष्टीचे होते गावात शाळा सुरू केली शाहू महाराजांचे वेदोक्त प्रकरण मध्ये 19 32 मध्ये सुद्धा या गावांमध्ये सहभाग अश्रुजी पाटील यांनी एक निर्णय घेतला त्यामध्ये मोहन व संभाजी या दोन मराठा समाजाच्या शिकून आले

१९६२ ला संतोषराव पाटील आमदार झाले पंढरीनाथ पाटील यांच्या लोकनाट्य चळवळ त्यांनी सुरू केली सत्यशोधकी जलसा या गावात सुरू केला आनंद स्वामी पश्चिम महाराष्ट्रातून आलेले लोक यांनी शेतकऱ्यांची लढाई लढली सावकारांच्या भाषेतून शेतकऱ्यांना पंढरीनाथ पाटील यांनी श्रद्धानंद वस्तीगृह काढले १९५२ मध्ये तत्कालीन शेतकी मंत्री भाऊसाहेब देशमुख यांचे हस्ते १९३६ ला सुरु केलेल्या सावर्जनिक वाचनालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन केले

मराठवाडा मुक्ती संग्राम सावरगाव डुकरे येथील तरुणांनी यामध्ये सहभाग घेतला होता याच गावात युवकाच्या सहभाग घेण्यास सुरुवात आप्पासाहेब यांनी केली त्या काळात एक गाव एक पाणवठा होता 1935ला या ठिकाणी बांधण्यात आला

TOWN PLAINING च्या प्रमाणे गावाची रचना आहे . गावात खुले नाट्य व्यासपीठ आहे . म गांधी बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा मध्यभागी आहे महात्मा फुले चौक असून महात्माफुले यांचा पुतळा आहे गावातील प्रत्येक घरातील व्यक्ती चांगल्या पदावर आहे शासनाच्या नोकरीला आहे .

विदर्भाच्या बहिणाबाई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोदावरीबाई पाटील सावरगावच्या आहेत

चिखली तालुक्यातील सावरगावने माअप्पासाहेब पाटील.आ., स्वातंत्र्यसैनिक उत्तमराव पाटील, मा बाबुरावजी पाटील.आ. यांच्यासारखी अनेक ताकदीची माणसं या जिल्ह्याला दिलीसत्यशोधक विचारांच्या बाबुरावजी पाटील यांनी आयुष्यभर . सत्य,निष्ठा,आणि मूल्यवर्धित राजकारणाचा पुरस्कार केला.राजकारणातील चुकीच्या धोरणांना परखडपणे विरोध केला.





सार्वजनिक पाणवठे खुले

सार्वजनिक वाचनालयाची इमारत

**शैक्षणिक संस्था - चिखली येथे पंढरीनाथ पाटील यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्था ची शाळा उघडली व शाखा चिखली तालुक्यात आहेत . त्याचप्रमाणे शिक्षण प्रसारक मंडळ यांची सुद्धा मुख्य संस्थाआहे त्यांच्या शाखा कोलारा,एकलारा येथे आहेत**

## 6.लोकोत्सव.=आदिवासी संस्कृती,नृत्य परंपरा,गाणी,पेहराव,भाषा,बोली भाषा, धर्म परंपरा, श्रद्धा स्थाने,यात्रा,उत्सव,

**लोक जमात**

चिखली तालुक्यातील किन्नी नाईक, हिवरा नाईक या भागामध्ये आंध जमातीचे लोक राहतात. सध्या हे लोक मोलमजुरी करून जीवन जगतात व शिक्षण घेतात तसेच साकेगाव येथे पारधी जमातीचे लोक राहतात,व करवंड येथे शिकलकर जमातीचे लोक राहतात हे लोक लाकडी खेळणे व वस्तू तयार करून यात्रांमध्ये विकतात व संपूर्ण भारतात ही लोक भ्रमण करतात व व्यवसाय करतात हे लोक नवरात्र उत्सवात घरी परततात व या जमातीमध्ये अजूनही जातपंचायत दरवर्षी भरवली जाते आणि यांच्यामध्ये अजूनही बालविवाहाची प्रथा दिसून येते

अध्यात्मिक उत्सवांसाठी चिखलीची विशेष ओळख जिल्ह्यात आहे.. सातगाव आणि साकेगाव येथे पुरातन मंदिराचे अवशेष आहे. तालुक्यात सैलानी बाबांची यात्रा होळीच्या पंचमीला मोठ्या प्रमाणावर भरते, देश-विदेशातील मुस्लिम भक्त या यात्रेला मोठ्या प्रमाणावर येतात.

**लोकोत्सव**

गेल्या सव्वाशे वर्षांपासून चैत्र पाडवा ते चैत्र पौर्णिमा या कालावधी चिखलीच्या रेणुका मातेची यात्रा भरते यात प्रामुख्याने देवीचे वहन हा महत्त्वाचा सोहळा असतो या सर्व जाती धर्मातील लोक आनंदाने सहभागी होतात या उत्सव समितीकडून रक्तदान शिबिरे, वैद्यकीय तपासणी शिबिरे अशी समाजोपयोगी कामे केली जातात. मुलांसाठी वस्तीगृहही चालवले जाते. हा वैशिष्ट्यपूर्ण सोपस्कार आपल्याला चिखली यात्रेत बघायला मिळतो.

अशीच यात्रा अमडापूरच्या बल्लाळ देवीची यात्रा ची यात्रा भरते. या मंदिराचा जीर्णोद्धार छत्रपती संभाजी महाराजांचे कमाविसदार खंडोबाला यांनी केला म्हणून या देवीला बल्लाळदेवी म्हणून संबोधले जाते हे मंदिर पांडवकालीन असल्याचे म्हटले जाते. चिखली पासून आठ किलोमीटर अंतरावर असलेले रोहडा (तपोवन) येथेही रेणुका मातेचे प्राचीन मंदिर आहे येथे अश्विन आणि चैत्र महिन्यात यात्रा भरतात.प्राचिन मंदिराचा जिर्णोद्धार श्री.प्रेमराजजी भाला यांनी केलेला आहे.मंदिराजवळ पायर्यांनी उतरून जाता येईल अशी प्राचीन बारव आहे. विदेही संत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वैकुंठ वासी रामभाऊ महाराजांची कोलाऱ्याची यात्रा ,वैकुंठवासी संत श्री.किसनराव महाराजांची एकलारा ची यात्रा तसेच गोदरीची देवीची यात्रा हे यात्रोत्सव लोकोत्सव म्हणून चिखली तसेच पंचक्रोशी प्रसिद्ध आहेत. केवळ आध्यात्मिक नाही तर सामाजिक आर्थिक संदर्भ असलेल्या या लोकोत्सवातून आर्थिक उलाढालही बऱ्यापैकी होते

## 7. संत परंपरा..संतांची नावे,जन्म ठिकाण, कलगी परंपरा,जलसा परंपरा

चिखलीला संत परंपरेचा वारसा लाभलेला आहे अध्यात्मा सोबतच सामाजिक जाणीव जागृती केल्याचे उल्लेख आपल्याला आढळून येतात यात प्रामुख्याने रोहडा येथील संत बुलाखी दास उपाक्य लोटांगण महाराज यांचा उल्लेख करता येईल लोटांगण महाराजांचा जन्म रचना शिंपी कुटुंबात चिखली झालेला होता पण आयुष्याच्या शेवटच्या वर्षांमध्ये रोहडा येथे राहून त्यांनी आपले आध्यात्मिक कार्य केले. "मनाच्या विचारांच्या जडणघडणीत चांगला बदल केला तर माणूस वाईट विचारांपासून परावृत्त होतो आणि चांगले विचार करतो "अशी त्यांची शिकवण होती. त्यांनी समाजातील चोऱ्या करणाऱ्या डाका टाकणाऱ्यांच्या मानसिकतेत बदल घडवून चांगल्या व्यक्तीत रूपांतरित केल्याचे अनेक उदाहरणे त्यांचे जीवन चरित्रात आढळतात.

सवाल जवाब च्या स्वरूपातून सामाजिक समस्या, माणसाच्या स्वभावातील दुर्गुणांवर , गाण्यांच्या स्वरूपात' कलगी तुरा ,रंगायचा चिखली तालुक्यातील केवळ येथील कलगी परंपरा प्रसिद्ध आहे.

सावरगाव डुकरे येथील महर्षी पंढरीनाथ पाटील यांच्या पुढाकाराने सत्यशोधक जलसे झाल्याच्या नोंदी आढळतात कलगी किंवा जलसा सर्वसामान्य लोकामध्ये सामाजिक जाणीवांची जागृती करण्याचे एक सशक्त माध्यम होते

## 8.नैसर्गिक साधनसंपत्ती.. वने,जंगले,पठारे, भुरुपे,वृक्ष संपत्ती,औषधी वनस्पती.खनिज संपत्ती,वन्य प्राणी,अभयारण्य..

**नैसर्गिक साधन संपत्ती**

अजिंठ्याच्या डोंगराळ भागाचा काही भाग चिखली तालुक्यातून जातो चिखली तालुक्याच्या उत्तर भागात टाकरखेड हेलगा हरणी श्रीकृष्ण नगर हिवरा नाईक या भागात वने आढळतात यामध्ये प्रामुख्याने अंजन, बाभुळ, साग इत्यादी झाडे आढळतात या परिसरात रोही, नीलगाय, हरण, अस्वल हे जंगली प्राणी आढळतात

जंगलातून डिंक, बिबा, मोहफुले, चारोळी, करवंद हा रानमेवा मिळतो. अमडापूर,उदयनगर, तोरणवाडा या भागात लाल माती आढळते. अमडापूरला मन नदी परिसरात अर्ध मौल्यवान दगड सापडतात. प्राचीन काळी याचा व्यवसाय केला जात असे.

**व्यवसाय** -चिखली तालुक्यात जिनिंग प्रेसिंगचा जुना व्यवसाय आहे. या भागात तेल गिरण्या आढळतात. चिखली शहर हे मोठी औद्योगिक वसाहत असून महाबीज, महीको, निर्मळसिडस् कंपनीचे बीज प्रक्रिया केंद्र आहे. भानखेड भोकर या ठिकाणी गोडंबी तयार करण्याचे गृहउद्योग मोठ्या प्रमाणावर केले जातात. विशेष म्हणजे बिब्बे हाताने फोडून गोडंबी तयार केली जाते.

श्रीकृष्णनगर, बोराळा, भानखेड, भोकर, या गावांमध्ये कोळी जमातीचे लोक मुख्यता राहतात. व डिंक व बाभळीच्या बिया यांचा व्यवसाय करतात. हरणी करवंड असोला बु या भागात बंजारा समाजाचे लोकांचे तांडे आढळतात. चिखलीला दर सोमवारी गुरांचा मोठा बाजार भरतो.

**क्रीडा विशेष**-चिखली तालुक्यातील सवणा गावाचे क्रीडा मंडळामुळे जागतिक पडला वर नाव कोरले गेले आहे. येथील अनंता चोपडे यांनी ऑलिंपिक मध्ये बॉक्सिंग खेळात जिंकले आहे. तर येथील यश विकास खंडागळे यांनी यावर्षीच्या राष्ट्रीय खो खो खेळाची नेतृत्व केले आहे व येथीलच शिव लक्ष्मण कदम हा खोपच्या राष्ट्रीय संघामध्ये यश सोबत होता . येथे खो-खो कबड्डी बास्केटबॉल बॉक्सिंग धावणे अशा विविध खेळाचे खेळाडू येथे घडवले जातात

## 9.जल संपदा=तलाव,धरणे, नदी,पाणी व्यवस्थापन,वन्य .

**नद्या** -चिखली तालुक्यात पैनगंगा, मन ,जामवंती, रत्नजोहरा या नद्या असून पैनगंगा ही मुख्य नदी आहे. पैनगंगा नदीवर मेहकर तालुक्यात पेन टाकळी येथे धरण बांधलेले आहे या धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये चिखली तालुक्याचा याच धरणातून चिखली शहरात पाणीपुरवठा करण्यात येतो. चिखली सर्वात मोठे जलशुद्धीकरण केंद्र आहे देऊळगाव राजा तालुक्यातील खडकपूर्णा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुध्दा चिखली तालुक्याचा बहुतांश भाग येतो. चिखली तालुक्यात ब्राह्मणवाडा मोठे धरण आहे तर तेल्हारा येथे छोटी धरणे बांधलेली आहेत बऱ्याच ठिकाणी पाझर तलाव बांधण्यात आलेले आहे .अलीकडेच नदी रुंदीकरण, खोलीकरण प्रकल्प लोकसहभागमधून राबविण्यात आला आहे

हवामान सर्वसाधारणपणे उष्ण व कोरडे असून आरोग्यदायी आहे. स्थलपरत्वे मात्र हवामानात थोडाफार फरक आढळून येतो

## 10.शेती..शेती पिके,उत्पन्न,सिंचन व्यवस्था. माती प्रकार,जमीन,

**शेती** -चिखली तालुक्यात प्रामुख्याने रब्बी पिकांमध्ये सोयाबीन तूर मका ही पिके घेतली जातात खरीप हंगामात गहू हरभरा ही पिके प्रामुख्याने घेतली जातात. तर डाळिंब पेरू पपई द्राक्ष ही फळे घेतली जातात चिखली परिसरात भाजीपाला बागायती पिके घेतली जातात

पैनगंगेच्या नदीकाठी सुपीक जमीन आढळते नदी काठी बागायती क्षेत्र आहे .

खरीप व रबीसाठीच्या बीजोत्पादनात बुलढाणाजिल्हा राज्यात अग्रेसर म्हणून ओळखला जातो. यामध्ये सर्वांत अग्रेसर तालुका म्हणून चिखलीची गणना होत असून बीजोत्पादनासह प्रक्रिया केंद्रांमुळे तालुक्याला आता 'सीड हब' म्हणूनही ओळख मिळाली आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांनीही समृद्धीची कास धरली आहे.

जिल्ह्यातील एकूण बीजोत्पादन क्षेत्रापैकी अध्यपिक्षा जास्त वाटा हा चिखली तालुक्याचा आहे. तालुक्यात प्रामुख्याने सोयाबीन, मूग, उडीद, कांदा, कंपाशीच्या बीजोत्पादनाचे क्षेत्र अधिक आहे. यासह मिरची, टोमॅटो आदी भाजीपालावर्गीय पिकांचेही बीजोत्पादन घेतले जाते.

चिखली महाबीजचे महत्त्वाचे केंद्र असल्याने त्याचाही फायदा तालुक्यातील शेतकऱ्यांना होत आहे. सोबतच तालुक्यातील बीजोत्पादन आणि याकडे वर्षागणिक वाढणारे शेतकरी पाहता विविध बियाणी कंपन्यांचीही येथे पाळीमुळे खोलवर रुजली आहेतदरम्यान पारंपारिक पिकांपेक्षा शेडनेट, पॉलिहाऊस सह खुल्या पद्धतीचे बीज उत्पादन शेतकऱ्यांना फायदेशीर ठरत आहे. बाजारभावाच्या तुलनेत बीजोत्पादनातून शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाला 25 टक्के अधिक मोबदला मिळत असल्याने याद्वारे शेतकरी देखील आर्थिक प्रगती साधताना दिसून येत आहेत. कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन मिळवण्याकडे शेतकऱ्यांचा कल असल्याचे दिसून येत आहे

## 11. व्यवसाय ,बाजार पेठ,प्रमुख व्यवसाय,उद्योग धंदे,हातमाग,कापड काम,लाकूड काम,विणकाम,गृहोद्योग...

**व्यवसाय** देउळगाव धनगर, शेलगाव आटोळ या परिसरामध्ये बांधकामास उपयुक्त अशा दगडांच्या खाणी असून त्यातून बांधकामास आवश्यक लागणारी गिटटी तयार केली जाते, तसेच चिखली तालुक्यात वीट भट्टी व्यवसाय सुद्धा चालतो. मेरा या ठिकाणी सोन्याचे दागिने बनवण्याचा व्यवसाय हा पूर्वीपासून चालत आलेला व्यवसाय आहे.

चिखली तालुक्यातील चांधई गोदरी या भागात पानमळे आहेत.

करवंड येथे शिकलकर जमातीचे लोक राहतात हे लोक लाकडी खेळणे व वस्तू तयार करून यात्रांमध्ये विकतात व संपूर्ण भारतात ही लोक भ्रमण करतात व व्यवसाय करतात

**चिखली तालुक्यात काही गावांमध्ये बिब्यांपासून गोडंबी तयार करण्याचा उद्योग काही आदिवासी जमातीचे लोक मोठ्या प्रमाणावर करतात**

जिल्ह्यातील इतर तालुक्यांच्या मानाने सिंचनाची बऱ्यापैकी सुविधा या तालुक्यात उपलब्ध झाली आहे. चिखली तालुक्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला भारतीय पातळीवर चांगली मागणी आहे.

केळवद येथे लोखंडी पेरणीचे शेती अवजारे बनवले जातात लहान यंत्रसामग्री व दुरूस्ती इत्यादींच्या कारखान्यांचा समावेश होता. यांशिवाय जिल्ह्यात पशुपालन व दुग्धोत्पादन, कुक्कुटपालन, मासेमारी, जंगल उत्पादन इ. अन्य व्यवसाय चालतात

## 12.सारांश

शैक्षणिक सुविधांच्या बाबतीत चिखलीचे नाव राष्ट्रीय पातळीवर अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या व त्यांच्या संलग्न शैक्षणिक संस्थांत संस्थांद्वारे सर्वमान्य होऊ लागले आहे. सहकार क्षेत्रातील सूतगिरणी, शुगर मिल इत्यांदीमुळे रोजगाराच्या संधी स्थानिक पातळीवर निर्माण झाल्या आहेत. चिखली शहरात सर्व प्रकारच्या शैक्षणिक संस्थांआहे त्याच प्रमाणे खाजगी पतसंस्था सुद्धा मोठ्या प्रमाणात आहे .

चिखली तालुक्यात बिजोत्पादनाचे एकूण क्षेत्र 6 हजार 648.20 हेक्टर तर उत्पादन 97 हजार 175 क्विंटल आहे. या बीजोत्पादनातून सुमारे 98 कोटींची उलाढाल एकट्या चिखली तालुक्यात होत असल्याचा समोर आले आहे.

चिखली तालुक्यातील बीजोत्पादनाची स्थिती पाहिली असल्यास या तालुक्यात 14 सीड प्रोसेसिंग प्लांट असून 37 फार्मर प्रोडूसर कंपनी कार्यरत आहेत तर 89 शेडनेट असून तीन पॉलिहाऊस आहेत. तर बीजोत्पादन क्षेत्र आणि उत्पादन आकडेवारी पाहिल्यास सोयाबीन कंपनी 4683 हेक्टर मध्ये लागवड केली आहे तर जवळपास 70,250 क्विंटल मध्ये उत्पादन झाला आहे

चिखली तालुक्याला बुलडाणा जिल्ह्याचे राजकीय , शैक्षणिक ,सामाजिक क्रांतीचे केंद्र मानले जाते . नागपूर नंतर चिखली हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे केंद्र मानले जाते

चिखली येथे सर्व शासकीय कार्यालय आहेत .

**संदर्भ :-**


१. https://vishwakosh.marathi.gov.in/29491/

२. https://www.wikipedia.org/

३. श्री शंतनू पाटील यांची मुलाखत

४. बल्लाळ देवी संस्थान


## संकलन व लेखन


१. रविंद्र नादरकर पदवीधर शिक्षक ,
जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा गोदरी

२. राजेश साळवे सहायक शिक्षक
जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा सवणा

३. सुवर्णा कुलकर्णी सहायक शिक्षक आदर्श विद्यालय चिखली

४. सुषमा पाटील ,साधन व्यक्ती चिखली

५. सीमा वानखेडे , साधन व्यक्ती चिखली

६. निलेश शिंगणे सहायक शिक्षक
छत्रपती संभाजी राजे विद्यालय केळवद